महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर, अश्वत्थनगर, नागपूर-२२
दूरध्वनी/फॅक्स क्र.0712-2221041, ई-मेल: [illegible]@gmail.com

जाक्र.सआसकना/स्वाधार/1305 /२२-२३/ नागपूर दिनांक: 01/03/23

S.D.K.S.D.C & WANADONGARI
Date of Receipt 02/03/23
Inward No. 4965
Department
Signature

प्रति,
प्राचार्य (सर्व महाविद्यालय)
नागपूर जिल्हा

विषय:- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२१-२२ या शैक्षणिक सत्रातील त्रृटी पुर्तता करणेबाबत.

शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२ दि. १३ जून २०१८ नुसार विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू करण्यात आली. सदर शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुला-मुलीं प्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते.

त्या अनुषंगाने नागपूर जिल्हयातील सत्र २०२१-२२ मध्ये स्वाधार योजनेचा लाभ मिळणेकरीता अर्ज केलेल्या सर्व अर्जाची तपासणी/छाणनी करण्यात आली असून काही विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रृटया आढळुण आलेल्या होत्या अशा विद्यार्थ्यांना या कार्यालया मार्फत अनेकदा भ्रमनध्वनी दवारे संपर्क करुणही अद्यापही त्रृटी पुर्तता केलेली नाही.

अशा विद्यार्थ्याकरीता दि. ०५.०३.२०२३ रोजी रविवारला एक दिवसीय शिबिर आयोजित केलेले आहे. करीता ज्या विद्यार्थ्यांनी त्रृटी पुर्तता केलेली नाही अशा विद्यार्थ्याकरीता त्रृटी पुर्तता करण्याकरीता अंतीम संधी देण्यात येत असुन त्रृटी पुर्तता करणेबाबत आपले महाविद्यालयातील सुचना फलकावर नोटीस लावून विद्यार्थ्यांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर येथे दि. ०५.०३.२०२३ रोजी सकाळी ११.०० ते २.०० वाजेपर्यंत उपस्थित राहणेबाबत आपले स्तरावरुन कळविण्यात यावे.

(सुकेशिनी तेलगोटे)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, नागपूर

To
UG director
student section &
IT to display it on website
Deepak